# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


**परिपत्रक/महत्वाचे**

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2019/ ५९६

दिनांक: - 3 JUN 2019

**विषय:-** शैक्षणिक वर्ष 2019-20 करिता प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका औषधनिर्माण अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेचे पत्र सादर करणेबाबत...

संदर्भ:- 1. उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक टीईएम-2018/प्र.क्र.244/तांशि-4 दि. 22.06.2018

2. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एनजीपी/मान्यता/2018-19/623 दि. 22.06.2018.

3. या संचालनालयाची दि. 01.03.2019 व दि. 20.03.2019 रोजीची कारणे दाखवा नोटिस

उपरोक्त विषयास अनुसरुन नमुद करण्यात येते की, संदर्भ क्रमांक 1 वरील शासन निर्णयास अनुसरुन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाचा संस्थांना सहा महिन्यांच्या आत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याच्या अटीच्या अधीन राहून तसेच सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास या प्रकरणी संबंधीत संस्था पूर्णपणे जबाबदार राहील असे हमीपत्र रु. 100/- च्या स्टॅप पेपरवर घेवून शैक्षणिक वर्ष 2018-19 करीताच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत औषधनिर्माण अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात येईल, असे संदर्भिय क्र. 2 च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तसेच ही अट यापुर्वीच्या शैक्षणिक वर्षापर्यंत शासन मान्यता दिलेल्या व अदयापी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता न मिळालेल्या संस्थाकरीताही लागु राहील. सदर अटीच्या अनुषंगाने संबंधित संस्थेने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे मान्यता मिळण्यासंदर्भात अर्ज करुन ती मान्यता सहा महिन्यांच्या आत म्हणजे दि. 31.12.2018 पर्यंत सादर करणे आवश्यक होते. परंतु, दि. 31.12.2018 पर्यंत ज्या संस्थांनी अदयापपर्यंत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली मान्यता प्राप्त केली नाही, अशा संबंधित संस्थांच्या प्राचार्यांना संदर्भिय क्रमांक 3 अन्वये कारणे दाखवा नोटीस सुध्दा निर्गमित करण्यात आली होती. सदर नोटिसात फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे मान्यतेचे पत्र सादर न केल्यामुळे शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतून सदर अभ्यासक्रम का वगळण्यात येऊ नये ? याबाबतचा खुलासा पत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन 10 दिवसाच्या आत या संचालनालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु, अदयापपर्यंत सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील संस्थांनी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे मान्यतेचे पत्र या संचालनालयास सादर करण्यात आले नसल्याचे दिसुन येत आहे.

त्याअनुषंगाने संबंधित औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांना कळविण्यात येते की, पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेस फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त झाली असल्यास दि. 10/06/2019 पर्यंत या संचालनालयास सादर करण्यात यावी. अन्यथा सदर संस्थांचा शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही. तसेच सदर मान्यतेअभावी भविष्यात उद्भवणाऱ्या परिणामास संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहील, यांची संबंधित पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती,औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक, पुणे.
2. कार्यासन क्रमांक 3,(माहिती तंत्रज्ञान शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे तसेच उचित कार्यवाहीसाठी रवाना.

## List of Diploma Pharmacy Institute who not got approval from Pharmacy Council of India, New Delhi for A.Y. 2019-20

| SN | DTE Code | Name Of Institute | Institute Type | Intake for admission 2019 |
|---|---|---|---|---|
| 1 | 1133 | Anuradha College Of Pharmacy, Chikhli | Un-Aided | 60 |
| 2 | 1286 | Institute of Pharmacy & Research, Badnera | Un-Aided | 60 |
| 3 | 1287 | Raje Laxmansingh Bhosale College of Pharmacy, Hingna Barlinga | Un-Aided | 60 |
| 4 | 1288 | Vardhaman College of Pharmacy, Karanja (LAD), Washim | Un-Aided | 60 |
| 5 | 2156 | Dayanand Education Society's Dayanand College of Pharmacy, Latur | Un-Aided | 60 |
| 6 | 2157 | Sahyog Sewabhavi Sanstha's Indira College of Pharmacy, Nanded | Un-Aided | 60 |
| 7 | 2593 | S.R. Institute of Diploma in Pharmacy, Udgir | Un-Aided | 60 |
| 8 | 2597 | MDA School of Pharmacy, Kolpa | Un-Aided | 60 |
| 9 | 2600 | Keshavrao Patil Institute of Pharmacy, Osmanabad | Un-Aided | 60 |
| 10 | 3235 | Gahlot Institute of Pharmacy, Koparkhairane, Navi Mumbai | Un-Aided | 60 |
| 11 | 3480 | Yashwantrao Bhonsale College of Pharmacy, A/P Charathe, Sawantwadi | Un-Aided | 60 |
| 12 | 4655 | Dr.Arun Motghare Diploma in Pharmacy, Kosara, Konda | Un-Aided | 60 |
| 13 | 5466 | Shiva Trust, Shivajirao Pawar College of Pharmacy, At-Pachegaon, Tq.Newsa, Ahmednagar | Un-Aided | 60 |
| 14 | 6893 | Sant Dnyaneshwar Shikshan Sanstha, Annasaheb Dange College of B.Pharmacy, Ashta, Sangli | Un-Aided | 60 |
| 15 | 6915 | Dnyanvilas College Of Pharmacy, Dudulgaon Tal Haveli Dist Pune | Un-Aided | 60 |